जिल्हाधिकारी, नाशिक व नाशिक विभागातील अन्य शासकीय कार्यालयाकरिता खाजगी पुरवठादारांकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांचे दर करार निश्चित करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार)**
**शासन निर्णय क्रमांक:- वाहन-२१२१/प्र.क्र.४७/राशि-३,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १६ एप्रिल, २०२६

**वाचा :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.वाहन-२१२१/प्र.क्र.४७/का.३१ (शापसे), दिनांक ०६ मे, २०२५
२) विकास आयुक्त(उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र. उसं/भांख/खरेदी तक्रार/ नाशिक प्रोटोकॉल/२०२/अे-९६१, दिनांक २९ सप्टेंबर, २०२५
३) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६६/राशि-३, दिनांक २७ मार्च, २०२६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यास भेट देणाऱ्या मा. राज्य अतिथी / मान्यवर यांच्या परिवहनाकरिता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना डी. व्ही. वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तथापि, जिल्ह्याच्या ठिकाणी एकाच वेळी अनेक मान्यवर भेटीसाठी आल्यास व शासकीय डी. व्ही. वाहने अपुरी पडल्यास खाजगी वाहन पुरवठादांकडून भाड्याने वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत दरकरार करण्यात येतो. जिल्हाधिकारी नाशिक कार्यालयाकडील यापूर्वीचा दरकरार संपुष्टात आल्यामुळे, अति महत्वाच्या व्यक्ती व राज्य अतिथी यांच्या नाशिक दौऱ्यासाठी शासकीय वाहन उपलब्ध नसेल त्यावेळेस वर्दी करण्यासाठी, विविध प्रकारच्या वाहनांचा दरकरार निश्चित करण्याबाबत अधिकृत भाडोत्री वाहन पुरवठादारांकडून दर मागविणेसाठी व पुरवठादारांचे पॅनल तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुषंगाने मे. गणेश टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक यांचे ई-निविदेतील सर्व बाबींसाठीचे निम्नतम (एल-१) दर हे तुलनात्मक वाजवी असल्यामुळे त्यांचेसोबत दरकरार करण्यास संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली. प्रस्तुतचा शासन निर्णय प्रशासकीय कारणास्तव अधिक्रमित करुन नाशिक विभागातील जिल्हयांना भेट देणाऱ्या सन्माननिय राज्य अतिथी व मान्यवरांच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय डी. व्ही. वाहन उपलब्ध नसेल त्यावेळेस वर्दी करण्यासाठी, खाजगी वाहन पुरवठादारांचे पॅनल तयार करण्यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेमध्ये नमूद पार्श्वभूमी विचारात घेता, संदर्भ क्र. १ येथील दिनांक ६ मे, २०२५ रोजीचा शासन निर्णय प्रशासकीय कारणास्तव अधिक्रमित करण्यात येत आहे. नाशिक विभागातील जिल्हयांना भेट देणाऱ्या सन्माननिय राज्य अतिथी व मान्यवरांच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय डी. व्ही. वाहन उपलब्ध नसतांना, वाहन पुरवठादारांचे पॅनल तयार करुन या पॅनलमधील पुरवठादारांकडून भाडयाने वाहने उपलब्ध करुन घेण्यासाठी सोबतच्या विवरणपत्र-“अ” मध्ये नमूद दरांना तसेच

निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून खालील पुरवठादारांचे पॅनल करुन या पॅनलमधील पुरवठारांकडून विवरणपत्र-अ मधील नमूद दराने वाहने उपलब्ध करुन घेण्यासही या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पॅनलमधील वाहन पुरवठादाराचे नांव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **मे. रोहन टुर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक**<br>शॉप क्र. १, सुविधीनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी,शिंगाडा तलाव, नाशिक ४२२००२ **ई-मेल :-** rohantravels95@gmail.com | ९४२२२५५४५५/<br>९७६२१११२१ |
| २ | **मे. कोकीळा टुर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स,**<br>प्लॉट क्र. १२, सिंगापूर गार्डन, टाकळी रोड, द्वारका, नाशिक ४२२०११४. | ९४२२२५२९६०/<br>९५५२२५२९६० |
| ३ | **मे. रुद्रांश टुर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स,**<br>गट क्र. १८/१९, प्लॉट क्र. ९/१०, ग्लोबल व्हिजन इंटरनॅशनल स्कुल,जवळ अंबड, नाशिक ४२२०१० | ९९२२९४८६८९ |
| ४ | **मे. श्री गणेश टुर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स,**<br>शॉप क्र. १, रजनी प्रभात अपार्टमेंट, अश्विन नगर, नाशिक ४२२००९<br>**ई-मेल :-** shriganeshtravels61@gmail.com | ९८९०२२५८३५/<br>९२२५११०७७० |

२. उपरोक्तप्रमाणे नमूद केलेल्या पॅनलमधील खाजगी वाहन पुरवठादाराकडून वाहने भाडयाने घेण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, नाशिक व नाशिक विभागातील अन्य शासकीय कार्यालये यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

I) ई-निविदा सूचनांमधील अटी व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र "अ" मधील दर मान्य असलेल्या उपरोक्त पुरवठादारांसोबत वाहन पुरवठयाबाबतचा आवश्यक तो दरकरार तात्काळ करुन घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांनी करावी तसेच निविदेतील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

II) संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये दर कराराचा कालावधी २ वर्षाकरिता करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याने सदर दरकरार या शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १६/०४/२०२६ ते दिनांक ३०/०४/२०२७ पर्यत अंमलात राहील.

III) सदर दर करारामध्ये कोणतेही बदल वा सुधारणा करण्याचे अधिकार अंतिमत: शासनाचे राहतील.

IV) ई-निविदेमध्ये (१) मे. रोहन टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, नाशिक (२) मे. कोकीळा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, नाशिक (३) मे.रुद्रांश टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स,नाशिक या वाहन पुरवठादारांनी, भाड्याने वाहन पुरवठा करण्यासाठी ज्या वाहनांचे शुन्य दर नमूद केले आहेत, त्यानुसार सदर वाहनांचा वाहन पुरवठा करणे संबधित वाहन पुरवठादारास बंधनकारक आहे. यास्तव, शुन्य दर नमूद केलेल्या उक्त वाहन पुरवठाधारकाकडून शुन्य दर नमूद केलेल्या वाहनांची आवश्यकता भासल्यास नाशिक विभागातील सर्व शासकीय कार्यालयांनी प्रस्तुत वाहनांची मागणी सर्व प्रथम सबंधित पुरवठादाराकडे नोंदवावी. शुन्य दर नमूद केलेल्या वाहनांसाठी संबधित वाहन पुरवठादाराने वाहन पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यास, सदरची वस्तुस्थिती नाशिक विभागातील संबधित शासकीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या निदर्शनास आणून द्यावी व प्राप्त वस्तुस्थिती विचारात घेवून, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सबंधित वाहन पुरवठाधारकास

नोटीस बजावण्यात यावी व नियमानुसार त्यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करावी. त्यानंतरच पॅनल मधील वाहन पुरवठादार मे. गणेश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक यांच्याकडून त्यांनी निविदेत नमूद केलेल्या दराने वाहने भाडयाने घ्यावीत.

V) खाजगी वाहने भाडयाने उपलब्ध करुन घ्यावयाची झाल्यास जिल्हाधिकारी, नाशिक व नाशिक विभागातील अन्य शासकीय कार्यालये यांनी वरील पॅनलमधील पुरवठादारांकडूनच वाहने भाड्याने उपलब्ध करुन घ्यावीत. वरील शुन्य दर नमूद केलेल्या वाहनांव्यतिरिक्त, अन्य प्रकारची खाजगी वाहने पॅनलमधील सर्व पुरवठादारांकडून समान न्यायाने निविदेतील न्युनतम दरानुसार भाडयाने उपलब्ध करुन घेण्यात यावीत. जर एखाद्या पुरवठादाराने मागणीनुसार वाहने पुरविण्यास असमर्थता दर्शविली तर त्याप्रमाणे संबधित वाहन पुरवठादाराकडून लेखी घेण्यात यावे व त्याची प्रत बिलासोबत सादर करावी. मात्र, सातत्याने वाहन पुरवठादाराकडून वाहनांचा पुरवठा न होऊ शकल्यास तशी वस्तुस्थिती नाशिक विभागातील संबधित शासकीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या निदर्शनास आणून द्यावी व प्राप्त वस्तुस्थिती विचारात घेवून, दंडात्मक कार्यवाही करण्याची कार्यवाही करावी.

VI) उपरोक्त सर्व वाहन पुरवठादारांनी विविक्षित परिस्थितीत / अपरिहार्य कारणास्तव वाहने पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत शासन मान्य दराने अन्य वाहन पुरवठादारांकडून वाहन उपलब्ध करुन घेण्यास जिल्हाधिकारी, नाशिक व नाशिक विभागातील अन्य शासकीय कार्यालये यांना मुभा राहिल.

VII) संबंधित वाहन पुरवठादारांनी, वाहनाचा पुरवठा केल्यानंतर त्याबाबतचे देयक ३० दिवसांच्या आत संबंधित मागणीदार कार्यालयास अदा करण्यासाठी सादर करावे.

VIII) वाहन पुरवठा केल्यानंतर त्याबाबतची देयके वाहन पुरवठादारास ३ महिन्यांच्या आत अदा करणे अभिप्रेत आहे. राजशिष्टाचाराच्या प्रयोजनाकरिता घेतलेल्या वाहन पुरवठ्याबाबतची देयके तात्काळ प्राप्त करुन घेऊन ती संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २७ मार्च, २०२६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन, जिल्हाधिकारी, नाशिक व नाशिक विभागातील अन्य जिल्हाधिकारी यांनी शिफारशीसह ३० दिवसाच्या आत शासनास सादर करावीत.

IX) नाशिक विभागातील अन्य शासकीय कार्यालयांना त्यांच्या आवश्यकतेनुसार खाजगी पुरवठादारांकडून वाहने भाडयाने घ्यावयाची असल्यास, त्यांनी परस्पर संबंधित पुरवठादारांकडून सोबतच्या विवरणपत्रातील दरानुसार वाहने उपलब्ध करुन घ्यावीत. त्यावरील खर्च संबंधित शासकीय कार्यालय यांच्याकडील तरतुदींतून भागवावा. सदर खर्चाची देयके सबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रमाणित करावीत. यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी अनावश्यक पत्रव्यवहार किंवा मागणी करु नये.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०४१६१७४०२४१००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: CN = CHANDRAKANT KRISHNA MORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTM
Date: 2026.04.16 17:42:56 +05'30'

**( चंद्रकांत कृ. मोरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री {नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)} यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. उपमुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, औकाफ ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. मंत्री, पणन, राजशिष्टाचार यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

८. सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

९. प्रधान महालेखापाल ( लेखापरिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई

१०. प्रधान महालेखापाल ( लेखापरिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर

११. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई

१२. महालेखापाल २-(लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, नागपूर

१३. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
(विभागीय आयुक्त, नाशिक यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णय आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.)

१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१५. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक

१६. सामान्य प्रशासन विभाग/का.२५, मंत्रालय, मुंबई.

१७. वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई.

१८. मे.रोहन टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक शॉप क्र. १, सुविधीनाथ को-ऑप.हौसिंग सोसायटी, शिंगाडा तलाव, नाशिक ४२२००२

१९. मे. कोकीळा टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, प्लॉट क्र. १२, सिंगापूर गार्डन, टाकळी रोड, द्वारका, नाशिक ४२२०११४.

२०. मे. रुद्रांश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स,गट क्र.१८/१९, प्लॉट क्र. ९/१०, ग्लोबल व्हिजन इंटरनॅशनल स्कुल,जवळ अंबड, नाशिक ४२२०१०

२१. मे. श्री गणेश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, शॉप क्र. १, रजनी प्रभात अपार्टमेंट, अश्विन नगर, नाशिक ४२२००९

२२. निवड नस्ती/राशि-३

**शासन निर्णय क्र.वाहन-२१२१/प्र.क्र.४७/राशि-३, दिनांक १६ एप्रिल, २०२६ सोबतचे विवरणपत्र- “अ”**

जिल्हाधिकारीनाशिक व नाशिक विभागातील अन्य शासकीय, कार्यालयाकरिता खाजगी वाहन पुरवठादाराकडून घ्यावयाच्या निम्नतम दराचा तक्ता (सर्व करांव्यतिरिक्त)

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन वापराचे दर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ८ तास / ८० कि.मी. करिता दर (रुपये) | १२ तास / १२० कि.मी. करिता दर (रुपये) | २४ तास / २४० कि.मी. करिता दर (रुपये) | ८/१२/२४ तासा पुढील प्रत्येक तासाकरिता (रुपये) | ८०/१२०/२४० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. करिता दर (रुपये) | ५ दिवस / १२०० कि.मी. (रुपये) | एक महिन्याकरिता / २००० कि.मी. (रुपये) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | स्विपट डिझायर | १६२० | २५२० | ४००० | ५० | १५ | २०००० | ५०००० |
| २ | होंडा अमेझ | १६२० | २५२० | ४००० | ५० | १५ | २०००० | ५०००० |
| ३ | हुंन्दाई वेर्ना | १७०० | २६०० | ४००० | ५० | १५ | २०००० | ५०००० |
| ४ | कोरोला अल्टीस | २००० | २८०० | ४५०० | ८० | २० | २२५०० | ५०००० |
| ५ | होंडा सिविक | २००० | २८०० | ४५०० | ८० | २० | २२५०० | ५०००० |
| ६ | होंडा सिटी | २००० | २८०० | ४५०० | ८० | २० | २२५०० | ५०००० |
| ७ | टोयोटा इनोव्हा हायक्रॉस | २६०० | ३३०० | ६१२० | ८० | २० | ३५००० | ८२५०० |
| ८ | टोयोटा इनोव्हा क्रिस्टा | २५०० | ३३०० | ६१२० | ८० | २० | २९००० | ८२००० |
| ९ | टोयोटा फॉर्च्युनर | ३००० | ३५०० | ८००० | ८० | २० | २५००० | ९०००० |
| १० | मर्सिडीज बेंझ | १२००० | १५००० | ३५००० | ११० | ० | ० | ० |
| ११ | मिनी बस १७ सिटर | १२००० | १५००० | २८००० | ८० | ४० | ० | ० |
| १२ | मिनी बस ३२ सिटर | २०००० | २०००० | ३५५०० | ८० | ४० | ० | ० |

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: CN = CHANDRAKANT KRISHNA MORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTM
Date: 2026.04.16 17:43:06 +05'30'

( चंद्रकांत कृ. मोरे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन